२०१२
जागतिक
सहकार वर्ष
सहकाराच्या माध्यमातून चांगल्या जगाची निर्मिती

DNS BANK
डोंबिवली नागरी सहकारी बँक लि.
(शेड्यूल्ड बँक)
अर्थाला विश्वास मिळे अन् विश्वासाला अर्थ मिळे!

४२वा वार्षिक अहवाल २०११-१२

42ND ANNUAL REPORT 2011-12



जागतिक महिला दिन कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित असलेल्या भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मुख्य सरव्यवस्थापक मा. सौ. सुधा दामोदर यांचे स्वागत करताना उपाध्यक्षा सौ. कुलकर्णी, समवेत भारतीय रिझर्व्ह बँकेच्या उपसरव्यवस्थापक मा. सौ. के. ज्योत्स्ना.

धर्मादाय निधी पुरस्कार वितरण समारंभात डावीकडून सरव्यवस्थापक श्री. गोपाळ परांजपे, समाजमित्र मा. श्री. संजीव विभुते, अध्यक्ष श्री. उदय कर्वे, सहकार मित्र मा. श्री. वसंतराव देवधर, बँकेचे सदिच्छादूत डॉ. सलील कुलकर्णी व उपाध्यक्षा सौ. नंदिनी कुलकर्णी.

बँकेच्या नूतनीकरण करण्यात आलेल्या संकेतस्थळाचे (website) उद्घाटन करताना माहिती व तंत्रज्ञान विषयातील तज्ज्ञ मा. श्री. दीपक घैसास सोबत अध्यक्ष श्री. कर्वे, संचालक श्री.जयंत पित्रे, सरव्यवस्थापक श्री. परांजपे व उपसरव्यवस्थापक श्री. मिलिंद वरेरकर.

बँकेच्या मुख्य शाखेतील पहिल्या ई- लॉबीचे उद्घाटन करताना कॅप्टन गौरी कुलकर्णी, समवेत बँकेचे अध्यक्ष श्री. कर्वे, संचालक श्री. दीपक नामजोशी व सरव्यवस्थापक श्री. परांजपे.

शंभुराजे या महानाट्याचे बँकेने सहप्रायोजकत्त्व स्वीकारले होते. या कार्यक्रमात शिवशाहीर मा. बाबासाहेब पुरंदरे यांचे स्वागत करताना बँकेचे अध्यक्ष श्री. कर्वे.

केंद्रीय अर्थसंकल्प २०१२ विश्लेषणात्मक व्याख्यान कार्यक्रमात विचार व्यक्त करतांना प्रमुख पाहुणे अर्थतज्ज्ञ व जागतिक व्यापार केंद्राचे संचालक मा. श्री. चंद्रहास देशपांडे, सरव्यवस्थापक श्री. परांजपे, प्रमुख वक्ते मा.श्री. किरीट सोमय्या, अध्यक्ष श्री. कर्वे व उपाध्यक्षा सौ. कुलकर्णी.

सांगली शाखा शुभारंभप्रसंगी विचार व्यक्त करतांना उद्घाटक मा. श्री.गणेश गाडगीळ, अध्यक्ष श्री. कर्वे, बँकेचे सदिच्छादूत डॉ. सलील कुलकर्णी व सरव्यवस्थापक श्री. परांजपे.

सहकार सुगंध यांच्या तर्फे आपल्या बँकेच्या वर्ष २०१०-११च्या अहवालास प्रथम पारितोषिक प्राप्त झाले. मा. सहकार आयुक्त श्री. मधुकरराव चौधरी यांचेकडून पारितोषिक स्विकारताना उपाध्यक्षा सौ. कुलकर्णी, सोबत संचालक मा. श्री. प्रभाकर वाणी व श्री. शिवाजी पाटील.

डोंबिवली नागरी सहकारी बँक लि. (शेड्यूल्ड बँक)

नोंदणी क्रमांक : टी.एन.ए./बी.एन.के./ १२७, दिनांक ४ जुलै १९७०
भारतीय रिझर्व्ह बँक लायसन्स : एसीडी. एमएच.-२२७ (पी) दिनांक ०९-१०-१९८०
''मधुकुंज'',प्लॉट क्रमांक पी-५२,एम.आय.डी.सी.फेज-२, कल्याण-शीळ रोड, सोनारपाडा, डोंबिवली (पूर्व)- ४२१ २०४.

४२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

या सूचनेद्वारे सर्व सभासदांना कळविण्यात येते की, बँकेची ४२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दि. ११ ऑगस्ट २०१२ रोजी सायंकाळी ठीक ०४.३० वाजता सुयोग मंगल कार्यालयाचे मामा निमकर सभागृह, पहिला मजला, टिळक पथ, स्टेट बँकेचे समोर, डोंबिवली (पूर्व) येथे खालील कामकाजाचा विचार करण्यासाठी होईल. सर्व सभासदांनी कृपया वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

सभेपुढील कामकाजाचे विषय :-

१) दि. ३१ जुलै २०११ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.
२) दि. ३१-०३-२०१२ रोजी संपलेल्या वर्षाचा, संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल आणि लेखापरीक्षकांनी तपासलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रक स्वीकृत करणे.
३) संचालक मंडळाने सुचविलेल्या नफ्याच्या विनियोगास मंजूरी देणे व लाभांश जाहीर करणे.
४) लेखापरीक्षकांकडून आलेल्या सन २०११-२०१२ या आर्थिक वर्षाच्या हिशेब तपासणी अहवालाची नोंद घेणे.
५) बँकेच्या मागील विशेष सर्वसाधारण सभेने मान्यता दिल्यानुसार, बँकेची, बहुराज्यीय सहकारी कायद्यांतर्गत (मल्टीस्टेट को-ऑप. सोसायटीज् ॲक्ट) नोंदणी करण्यासाठी सदर कायद्यानुसारचे आदर्श पोटनियम स्वीकृत करणे.
६) सन २०१२-२०१३ या आर्थिक वर्षासाठी अंतर्गत लेखापरीक्षकांची नेमणुक करणे व त्यांचे लेखापरीक्षण शुल्क ठरविणे.
७) वैधानिक लेखापरीक्षकांनी प्रमाणित केलेली संशयित व बुडित येणे बाकी, कर्ज वसुलीचे सर्व अधिकार अबाधित ठेऊन, केवळ निर्लेखित करणे.
८) मा. अध्यक्षांच्या अनुमतीने, आयत्या वेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
गो. गि. परांजपे
सरव्यवस्थापक

दिनांक : १८-०७-२०१२

टीप :-

१) गणसंख्येच्या अभावी सभा स्थगित झाल्यास अशी स्थगित झालेली सभा त्याच दिवशी, त्याच ठिकाणी एक तासानंतर म्हणजे सायंकाळी ०५.३० वाजता भरेल. त्या सभेस गणसंख्येचे बंधन असणार नाही.
२) सभेचे कामकाज व्यवस्थित पार पाडता यावे या दृष्टीने, ज्या सभासदांना काही सूचना मांडावयाच्या असतील अगर हिशेबविषयक अन्य माहिती विचारायची असेल, त्यांनी कृपया दि. ०७-०८-२०१२ पर्यंत सरव्यवस्थापकांकडे लेखी विचारणा करावी, म्हणजे माहिती देणे शक्य होईल.
३) बँकेचा २०११-२०१२ चा वार्षिक अहवाल दि. २८-०७-२०१२ नंतर सर्व शाखांमध्ये तसेच बँकेची वेबसाईट www.dnsbank.in येथे उपलब्ध असेल.

अन्य सूचना :-

१) ज्या सभासदांनी ₹१,०००/- पेक्षा कमी रक्कमेचे भाग-भांडवल घेतले आहे त्यांनी आवश्यक रक्कमेचा भरणा करून, किमान २० शेअर्सची (एकूण ₹१,०००/- पर्यंत) रक्कम लवकरात लवकर पूर्ण करावी.
२) पत्त्यातील बदल, शेअर्स विभागास लगेचच कळवावा. तसेच आपला ई-मेल कळवावा ही विनंती.
३) शेअर्सवरील लाभांश दरवर्षी आपल्या खात्यात जमा होतो आहे याकडे लक्ष द्यावे. आपण अद्याप लाभांश घेतला नसल्यास तो त्वरित घेण्यात यावा. पोटनियम क्र. ४६/४ नुसार, तीन वर्षामागील म्हणजेच सन २००८-०९ च्या बाकी असलेल्या लाभांशाची रक्कम दि. ३१-०३-२०१३ पर्यंत न घेतल्यास, बँकेच्या राखीव निधीत वर्ग करण्यात येईल.
४) घेतलेल्या शेअर्सकरीता नामनिर्देशन (नॉमिनेशन) करण्यात यावे. याकरीताचे फॉर्मस् सर्व शाखांमध्ये उपलब्ध आहेत.
५) आपण सभासद असल्याचे ओळखपत्र मागून घ्यावे. ओळखपत्रासाठी, आपले २ पासपोर्ट साईज रंगीत फोटो आवश्यक आहेत.
६) शेअर्स संदर्भातील पत्रव्यवहार आपल्या शाखेमार्फत करण्यात यावा.

DOMBIVLI NAGARI SAHAKARI BANK (Scheduled Bank)

Regd. No.-T.N.A./B.N.K./127, Dated 4TH July, 1970
Reserve Bank of India License No.: A.C.D./M.H./227 (P) Dated 09-10-1980
"Madhukunj ", Plot No. P-52, MIDC Phase -2, Kalyan-Shil Road, Sonarpada, Dombivli (East) 421 204.

Notice of 42nd Annual General Meeting

42nd Annual General Meeting of the Bank will be held on 11th August, 2012 at 4.30 pm at Suyog Mangal Karyalaya, Mama Nimkar Sabhagruha, 1st floor, Tilak Path, opp. State Bank of India, Dombivli (East) to transact following business. All shareholders are hereby called to remain present for the meeting.

Agenda of the meeting :

1. To confirm the minutes of Annual General Meeting held on 31st July, 2011.
2. To adopt Board of Director's Report, with Annual Accounts (Balance Sheet, Statement of Profit & Loss account) for the year ended 31st March, 2012.
3. To approve appropriation of Profit and declare dividend as proposed by the Board of Directors.
4. To take note of the Auditor's Report for the financial year ended on 31st March, 2012.
5. To adopt model Bye-laws prescribed under Multi-State Co-operative Societies Act, to facilitate registration of the Bank under Multi state Co-operative Societies Act, which had been already approved in the previously held Special General Meeting.
6. Appoint Internal Auditors for the financial year 2012-2013 and to fix their remuneration.
7. To write off the Bad & Doubtful Debts as certified by Statutory Auditors, keeping all the rights of Recovery intact against all concerned parties involved.
8. Any other subject with the permission of the Chair.

BY ORDER OF THE BOARD OF DIRECTORS
G.G.PARANJPE
CHIEF EXECUTIVE OFFICER & GENERAL MANAGER.

Dated:- 18.07.2012.

NOTE:
1. If the meeting is adjourned for want of quorum, then the meeting shall be held after one hour i.e. at 5.30 pm on the same day & at the same venue, which will not require quorum.
2. In order to ensure smooth orderly business at the Annual General Meeting, it is suggested that the members seeking any information or desiring to give any suggestions, about the financial accounts for the year ended on 31st March, 2012, should submit their queries/ suggestions in writing, addressed to General Manager on or before 7th August. 2012.
3. Annual Report for the year 2011-12 will be available at all Branches, and also available on the website www.dnsbank.in, after 28th July, 2012.

SUGGESTIONS:-
1. Minimum share capital required is ₹ 1000/- Members who have not subscribed to the minimum Share capital, are requested to submit application for the required amount of shares at the earliest.
2. Members are requested to inform about change of address, mobile number, land line number and email address immediately, to shares dept at Central Office.
3. Members may verify that Dividend is regularly credited to their account with our Bank. If any member has failed to obtain the dividend for last three years i.e. from the year 2008-09, the same be collected up to 31st March, 2013; Else as per bye-laws 46/4 it will be transferred to Reserve Fund of the Bank.
4. Members are requested to file Nomination for the shares held by them. Nomination forms are available at all Branches.
5. Identity cards are issued along with shares certificate. If any member has not received the same then the member should submit 2 passport size color photographs to the shares department, for issuing Identity Card.
6. Any communication regarding shares should be routed through Branch only.

भागधारक कल्याण निधी लाभार्थी योजना

१) सभासदाचे पाल्य १० वी च्या परीक्षेत ९५% व १२ वी मध्ये ९० % गुण मिळवून उत्तीर्ण झाल्यास वा विद्यापीठ स्तरावर कला, वाणिज्य व शास्त्र या पदवी परीक्षेत ७५ %, वैद्यकीय, अभियांत्रिकी, चार्टर्ड अकाऊंटंट, आर्कीटेक्चर आणि कायदा अशा व्यावसायिक पदवी परीक्षांमध्ये सलगपणे किमान ५५% तसेच कंपनी सेक्रेटरी, एमबीए, कॉस्ट अकाऊंटंट, एमएमएस, महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त विद्यापीठाची पदव्यूत्तर पदविका (पोस्ट ग्रॅज्युएशन डिप्लोमा)अशाही निरनिराळ्या प्रकारच्या व्यावसायिक विद्या शाखांच्या परीक्षांमध्ये सलगपणे किमान ५५% गुण मिळवून उत्तीर्ण झाल्यास अशा प्रत्येकास ₹ ५,०००/- देण्यात येतील. यासाठी सभासदाने पाल्याचे बाबतीत योग्य ती कागदपत्रे सादर करावीत. धनादेश पाल्याचे नांवे देण्यात येईल अथवा रक्कम खात्यात वर्ग करण्यात येईल. पुरस्कारासाठी अर्ज निकाल जाहीर झाल्यापासून ३ महिन्यांच्या आत, बँकेस सादर करावा.

२) सभासदाच्या निधनानंतर, मृत्यूचा दाखला सादर केल्यास वारसदारांस ₹ ५,०००/- मदत देण्यात येईल. सभासदाचे अपघाती निधन झाल्यास त्याच्या वारसांना मदतीपोटी ₹ १०,०००/- देण्यात येतील. या मदतीसाठीचा अर्ज बँकेकडे, सभासदाचे निधन झाल्यापासून ३ महिन्यांच्या आत सादर व्हावा.

३) सहकार क्षेत्रात डॉक्टरेटसाठी प्रबंध दाखल करणाऱ्या सभासदास ₹ ५,०००/- पर्यंत अर्थसहाय्य, त्यासाठी खर्चाचा दाखला सादर करावा.

४) अपघातामुळे कायमचे अपंगत्व आल्यास वैद्यकीय मदतीचा सहभाग ₹ १०,०००/- पर्यंत आणि याचा वापर फक्त सभासदांकरीताच असेल. यासाठीचा अर्ज बँकेकडे, अपघाताच्या घटनेनंतर ३ महिन्यांच्या आत सादर व्हावा.

५) सभासद व त्याच्या कुटुंबाकरीता सेरेब्रल पाल्सी, कॅन्सर, पॅरालिसीस, अल्झायमर, पार्कीसन्स अशा कायमस्वरुपाच्या गंभीर आजारांसाठीच्या वैद्यकीय खर्चात मदत ₹ १०,०००/- (फक्त एकदाच). खर्चिक उपचारांसाठी म्हणजे गुढगा प्रत्यारोपण (नी रिप्लेसमेंट) शस्त्रक्रिया, डायलिसीस, बायपास सर्जरी आणि ॲन्जियोप्लास्टी तसेच डॉक्टर/ वैद्य / इस्पितळ/ मान्यताप्राप्त संस्थेकडून घेतलेल्या हृदयविकारावरील आयुर्वेदिक उपचार यासाठीही मदत ₹ १०,०००/- (फक्त एकदाच). यासाठीचा अर्ज ६ महिन्यांच्या आत दाखल व्हावा.

६) सभासदांच्या कुटुंबातील (पती, पत्नी, मुले व आई तसेच वडील) मानसिक रुग्ण अथवा अपंग असलेल्या व्यक्तीच्या पालनपोषणासाठी अथवा शिक्षणासाठी आर्थिक मदत ₹ ७,५००/- (फक्त एकदाच).

* नियम व अटी लागू

* श्रध्दांजली *

बँकेचे माजी अध्यक्ष श्रीपाद तथा बाळासाहेब हळबे

ज्येष्ठ अभिनेते शम्मी कपूर, ज्येष्ठ संगीतकार श्रीनिवास खळे, ठाणे जनता सहकारी बँकेचे संस्थापक अध्यक्ष सी. ए. भगवानराव पटवर्धन, सुप्रसिध्द छायाचित्रकार गौतम राजाध्यक्ष, विरोधी पक्ष नेते एन.डी. पाटील, क्रिकेटर नवाब पतौडी, माजी पोलिस आयुक्त द. शं. सोमण, ज्येष्ठ गायक जगजीतसिंग, भुपेन हजारीका, उद्योगपती अरविंद मफतलाल, ज्येष्ठ नृत्य दिग्दर्शक सुबल सरकार, दिग्दर्शक व निर्माते सत्यदेव दुबे, बँकेचे माजी व्यवस्थापक पंढरीनाथ विष्णू गोगटे, ज्येष्ठ संगीतकार व संगीत संयोजक अनिल मोहिले, सिनेनट देवआनंद, ज्येष्ठ व्यंगचित्रकार मारिओ मिरांडा, ज्येष्ठ कवी माणिक गोडघाटे उर्फ ग्रेस, माजी आरोग्यमंत्री डॉ. विमल मुंदडा, स्वातंत्र्य सेनानी नागनाथअण्णा नाईकवडी, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते वसंतराव तांबे, प्रकाश मोहाडीकर, समाज प्रबोधक वामनराव पै, ज्येष्ठ साहित्यिक भा.द.खेर, ज्येष्ठ पत्रकार बी.के .करंजिया, राज्यशास्त्राचे अभ्यासक व थोर विचारवंत राम बापट, माजी पोलिस उपायुक्त व दक्षता मासिकाचे संपादक अरविंद पटवर्धन, रुस्तम-ए-हिंद दारासिंग, समाजसेविका मृणाल गोरे, माजी खासदार प्रा.बाळ आपटे, अभिनेते राजेश खन्ना, ज्येष्ठ समालोचक सुरेश सरय्या, स्वातंत्र्य सेनानी कॅप्टन लक्ष्मी सेहगल तसेच अन्य ज्ञात अज्ञात दिवंगत मान्यवर, हितचिंतक, ग्राहक, सभासद इत्यादींना भावपूर्ण श्रध्दांजली !

संचालक मंडळ

श्री. उदय मधुसुदन कर्वे	C.A., L.L.B. (General)	:	अध्यक्ष
सौ. नंदिनी शशिकांत कुलकर्णी	B.Com, L.L.B., C.A.I.I.B	:	उपाध्यक्षा
श्री. अच्युत मधुसूदन कऱ्हाडकर	B.Com	:	संचालक
श्री. जयंत बाळकृष्ण पित्रे	C.A., DISA	:	संचालक
श्री. गणेश हरिहर नायक	B.Sc.	:	संचालक
श्री. शिवाजी सुदाम पाटील	I.T.I.	:	संचालक
श्री. सुधाकर दत्तात्रय पातकर		:	संचालक
श्री. प्रभाकर रामचंद्र वाणी	B.Com, L.L.B.	:	संचालक
श्री. दीपक वसंत नामजोशी	M.Com	:	संचालक
श्री. नामदेव दत्तात्रय खंदारे	Instrument Mechanic	:	संचालक
सौ. वैशाली वसंत जोशी	B.A.	:	संचालिका
श्री. सतिश दत्तात्रय ओक	B.Arch.	:	संचालक
श्री. मिलिंद माधव कोपरकर	DEM, DEE	:	संचालक
डॉ. श्री. लहानू रुपजी कोंढारी	M.B.B.S.	:	संचालक
श्री. पुरुषोत्तम भुमय्या कुंदेन	B.Com	:	संचालक
श्री. सुहास राघवेंद्र कुलकर्णी	B.Sc., MBA	:	स्वीकृत संचालक
श्री. महेश सिध्देश्वर फणसे	B.E(Civil), M.A(Political Science)	:	स्वीकृत संचालक
श्री. अर्जुन शिवशंकर साळुंके	B.Com	:	कर्मचारी प्रतिनिधी
श्री. दीपक भिकल्या गांगोडे	B.A.	:	कर्मचारी प्रतिनिधी
श्री. गोपाळ गिरीधर परांजपे	M.A(Economics) L.L.B., J.A.I.I.B.	:	सरव्यवस्थापक

मुख्य अंतर्गत लेखा परीक्षक

मुकुंद एम. चितळे ॲन्ड कंपनी

शाखांसाठी अंतर्गत लेखा परीक्षक

मे. पी.व्ही. लिमये ॲन्ड असोसिएटस्
गोविलकर ॲन्ड असोसिएटस्
जोशी कुलकर्णी ॲन्ड कंपनी
काळे चौगुले ठिगळे ॲन्ड कंपनी
पाठक डबले ॲन्ड असोसिएटस्
एस्. बी. लोहार ॲन्ड कंपनी
अंजली म्हैसकर
आमडेकर ॲन्ड असोसिएटस
वाय.एस. प्रसादे ॲन्ड कं.
के.जी.बी. ॲन्ड जे असोसिएटस्
पराग प्रभुदेसाई ॲन्ड कंपनी
एस्.व्ही. भावे ॲन्ड कंपनी
जे. एस्. एस्. ॲन्ड असोसिएटस्
वैशंपायन पाध्ये

उपसरव्यवस्थापक

श्री. भालचंद्र माधव भोळे
B.Com., GDCA, Dip. in Co-op Banking, C.A.I.I.B.

श्री. मिलिंद रमेश वरेरकर
B.Com., D.B.M., System analyst, Comp. Programming C

श्री. नितिन श्रीपाद सुळे
B.Com., C.A.I.I.B, D.B.M.

श्री. पांडुरंग शंकर मोरे
M.A., L.L.B., J.A.I.I.B.

सहाय्यक सरव्यवस्थापक

श्री. अरविंद श्रीकृष्ण घोडगांवकर
M.Sc (Stats), C.A.I.I.B., D.P.S., D.B.M., D.T.M., D.M.M., D.C.M., G.D.C.A

श्री. मुकुंद अनंत जोशी
B.A., L.L.B (General), D.B.M., C.A.I.I.B

श्री. राजेश नरेंद्र शेटे
B.Com., G.D.C.A., Diploma in Co-op. Banking, C.A.I.I.B.

श्री. आर. वेदमूर्थी
M.Com., C.A.I.I.B., M.B.A., L.L.B.,

श्री. प्रकाश यशवंत पेडणेकर
B.Com., C.A.I.I.B.

श्री. पराग बाळकृष्ण नवरे
B.Com., G.D.C.A., C.A.I.I.B., N.C.F.M.

मुख्य व्यवस्थापक

सौ. शिवानी रमेश जोशी (निवृत्त)
B.Com., Diploma in Co-op. Banking

श्री. सतिश अनंत अभ्यंकर
B.Com., G.D.C.A., J.A.I.I.B., Diploma in Co-op. Banking

सौ. सुप्रिया सुहास बेहेरे
S.S.C., G.C.D.

श्री. शेखर वसंत प्रभू
B.Com., C.A.I.I.B., Diploma in Co-op.Banking

श्री. मंदार सुरेश दीक्षित
M.Com., G.D.C.A., C.A.I.I.B., Certificate course on Retail Banking, Corporate Banking.

सौ. सुनिता अविनाश पाटील
M.Com., C.A.I.I.B., I.C.W.A (Inter)

श्री. मकरंद श्रीराम आकूत
B.Com., L.L.B., J.A.I.I.B

श्री. प्रमोद अर्जुन चव्हाण
B.A (Economics), C.A.I.I.B

सौ. अलका सुधीर जोगळेकर
B.A., G.D.C.A.

श्री. आनंद गणेश जोशी
B.Com

श्री.भावेश अनुपकुमार रामनानी
B.Com.

श्री. नितिन गुरुनाथ काबाडी
B.Com., G.D.C.A., J.A.I.I.B.

श्री. मिलिंद मधुकर लिमये
B.Com., G.D.C.A.

सौ. संगिता सुनिल देशपांडे
B.A. (Economics), D.C.M.

श्री. सुनिल नारायण गाडगीळ
B.Com.,L.L.B., J.A.I.I.B.

श्री. रमेश मधुसुदन काळे
B.Com.

श्री. राजू मेहबूबसाब विजापुरे
M.Com., G.D.C.A.

श्री. शंकर मालू कोकरे
M.Com., C.A.I.I.B., G.D.C.A., D.C.B.

श्री. सुधीर दत्तात्रय साने
B.Com., C.A.I.I.B.

श्री. अविनाश बयाजी शेळके
B.Com., G.D.C.A., Dip.in Labour Laws, C.A.I.I.B.

सन्माननीय सभासद बंधू- भगिनी,
सप्रेम नमस्कार !

आर्थिक वर्ष २०११-२०१२ चा बँकेचा ४२ वा वार्षिक अहवाल आपल्यासमोर सादर करीत आहे.

प्रास्ताविक

सन २०११-१२ या वर्षामध्ये आपल्या बँकेने जवळजवळ सर्वच आघाड्यांवर उत्तम कामगिरी केली आहे. ज्या पार्श्वभूमीवर ही कामगिरी झाली, त्यामध्ये जागतिक तसेच राष्ट्रीय पातळीवर मात्र अनेक अडचणी व आव्हाने होती. राष्ट्रीय पातळीवर कमी झालेला आर्थिक विकासदर व वाढती महागाई ही दोन प्रमुख संकटे खूपच बिकट स्वरुपाची होती. देशाच्या आर्थिक विकासाचा दर व औद्योगिक उत्पादनाचा दर हा गेल्या काही वर्षातील निचांक पातळीवर गेला, तर महागाईच्या दराने मात्र उच्चांकाची पातळी गाठली होती. रुपयाच्या अवमुल्यनाने ही परिस्थिती अजुनच बिकट झाली.

अर्थ खाते व भारतीय रिझर्व्ह बँक यांना एकाचवेळी आर्थिकवृध्दीला बळकटी देणे व महागाईवर नियंत्रण ठेवणे या दोन्ही आव्हानांचा मुकाबला करावा लागला. रिझर्व्ह बँकेकडून सलग १३ वेळा मिळून एकूण ३.७५ टक्क्यांनी मुलभूत व्याजदरामध्ये वाढ करण्यात आली. भारतीय बँकींग व्यवस्थेमध्ये एकूण ठेवींमध्ये १३ टक्क्यांनी तर एकूण कर्जांमध्ये १७ टक्क्यांनी वाढ झाली आहे.

या पार्श्वभूमीवर, आपल्या बँकेच्या ठेवींमध्ये २१ टक्के वाढ होऊन त्या ₹ २२१० कोटींवर पोहोचल्या. तर कर्जांमध्ये २६ टक्के वाढ होऊन कर्जव्यवहार ₹ १५२४ कोटींवर पोहोचला आहे. ही खरोखरच समाधानकारक वाढ आहे. **इंडियन बँक्स असोसिएशनने आर्थिक वर्ष २०१०-११ साठीची देशभरातील सहकारी बँकांची तुलनात्मक आकडेवारी प्रसिध्द केली आहे. आपल्या बँकेचे, खेळत्या भांडवलाच्या तुलनेत असलेले ढोबळ नफ्याचे प्रमाण ३.१५ टक्के आहे. अन्य सर्व सहकारी बँकांच्या तुलनेत हे प्रमाण सर्वाधिक आहे, हे नमुद करण्यास विशेष आनंद होत आहे.** उपरोक्त पार्श्वभूमीवर, आपल्या बँकेची गत पाच आर्थिक वर्षात झालेली प्रगती तक्ता रुपाने खाली नमूद केली आहे.

यासंबंधीत काही महत्त्वाची माहिती खालीलप्रमाणे आहे.

ठेवी

अहवाल वर्षात बँकेच्या ठेवी २१ टक्क्यांनी वाढल्या. ही वाढ बँकींग क्षेत्रातील सरासरी वाढीपेक्षा जास्त आहे. यावरून ठेवीदारांमध्ये बँकेविषयी असलेला विश्वास प्रकट झाला असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. व्याजदरातील स्पर्धा, ठेवीदारांचे हित, बँकेच्या ठेवी व कर्जांचा तौलनिक अभ्यास करून या आर्थिक वर्षात परम, वरद, रिध्दी-सिध्दी व ओजस्विनी अशा विविध व्याजदराच्या ठेव योजना अंमलात आणल्या. या ठेव योजनांना चांगला प्रतिसाद लाभला.

आपल्या बँकेच्या एकूण ठेवींमध्ये बचत व चालू खात्यांचे प्रमाण ३१ टक्के आहे. एकूण ठेवींमध्ये विविध संस्थांच्या ठेवींचे प्रमाण ९ टक्के आहे. बँकेने सप्टेंबर २०१२ अखेरपर्यंतचा ठेवींवरील विमा हप्ता भरला आहे. मार्च २०१२ अखेर बँकेतील निरनिराळ्या ठेवींची एकूण ४,१६,२५२ खाती होती. मागीलवर्षी ही संख्या ३,७९,३८१ होती.

संचालक मंडळाकडून बँकेतील विविध ठेव योजनांचा नियमीत आढावा घेण्यात आला व त्यात कालानुरुप वेळोवेळी आवश्यक ते बदल करण्यात आले.

कर्जे

अहवाल वर्षात बँकेची कर्जे २६ टक्क्यांनी वाढली. ही वाढसुध्दा बँकींग क्षेत्रातील सरासरी वृध्दीपेक्षा अधिक आहे. मार्च २०१२ अखेर बँकेत एकूण २८,५७५ कर्ज खाती होती. ग्राहकांची वाढती व बदललेली गरज विचारात घेऊन बँकेने विविध कर्ज योजना तयार केल्या आहेत. सोन्याचे वाढते दर लक्षात घेऊन सोने खरेदीसाठी ''सुवर्णसंचय कर्ज योजना'' बँकेने सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत ग्राहकांना केवळ १३ टक्के व्याजदराने सोने खरेदीसाठी ₹ ५ लाखांपर्यंतचे कर्ज उपलब्ध करून दिले जात आहे.

लघु व अती लघु उद्योजकांना उत्तेजन मिळावे यासाठी एस.एम.ई. कर्ज योजनेद्वारे वित्त पुरवठा केला जातो. विविध आर्थिक परिमाणांची तपासणी

तपशील (मार्च अखेर रक्कम पूर्ण कोटीमध्ये)	२००७	२००८	२००९	२०१०	२०११	२०१२
१ भांडवल	२६	३१	४३	५०	५७	६०
२ ठेवी	७९३	१००३	१२६९	१५५४	१८२९	२२१०
३ कर्जे	५२८	६६३	७९९	९६१	१२०९	१५२४
४ गुंतवणूका	२९९	३७६	५३७	७४२	७१५	७९०
५ ढोबळ नफा	२५	३१	३८	४२	५८	६२
६ निव्वळ नफा	९	१२	१९	२२	२६	२७
७ प्रती कर्मचारी व्यवसाय	३	४	४	५	५	५
८ ढोबळ अनुत्पादित कर्जे (%)	११.२२	९.६०	४.६४	४.५४	५.१०	४.४६
९ नक्त अनुत्पादित कर्जे (%)	शून्य	शून्य	शून्य	शून्य	शून्य	शून्य
१० शाखा	१८	२८	३०	३५	३६	३७

करून पतमापनानुसार (क्रेडिट रेटिंग) अशा उद्योजकांना व्याजदरात सवलत देण्यात येते. अशा आर्थिक निकषांची पूर्तता करणाऱ्या लघुउद्योजकांना १२.२५ टक्के इतक्या अल्प व्याजदराने पतपुरवठा करण्यात येतो. अनेक उद्योजकांनी याचा लाभ घेतला आहे.

वस्त्रोद्योग, शेतीपूरक उद्योग तसेच नोंदणीकृत लघुउद्योजकांनी (SME) यंत्रसामग्रीसाठी आपल्या बँकेकडून घेतलेल्या कर्जाला अनुदान (Subsidy) मिळण्यासाठी नाबार्ड तसेच सिडबी सोबत बँकेने सामंजस्य करार केला आहे. सदर अनुदान मिळण्याच्या दृष्टीने काही उद्योजकांच्या अर्जावर प्रक्रिया सुरु असून, त्याबाबतचा निर्णय लवकरच अपेक्षित आहे.

बँकेने २०११-१२ या आर्थिक वर्षात वितरीत केलेल्या विविध कर्जांची विगतवारी खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	तपशील	रक्कम (₹ पूर्ण कोटींमध्ये)	एकूण कर्जांशी टक्केवारी
(१)	उद्योग	६७८.७०	४४.५२
(२)	गृहकर्ज	२७९.७७	१८.३५
(३)	व्यापार	२४३.५८	१५.९८
(४)	व्यवसाय	४१.७८	२.७४
(५)	शिक्षण	१५.३५	१.०१
(६)	वाहन	१२७.२१	८.३५
(७)	शेती	१३.४१	०.८८
(८)	इतर	१२४.६२	८.१७
	एकूण	१,५२४.४२	१००.००

रिझर्व्ह बँकेच्या आर्थिक निकषांनुसार आपल्या बँकेची एका कर्जदाराला कर्ज देण्याची जी मर्यादा ठरते, त्याहूनही पुरेशी कमी अशी स्वयंनियंत्रित एक मर्यादा आपण निश्चित केली आहे. बँकेने एका कर्जदारासाठी स्वतः ठरविलेल्या कर्ज मर्यादेपेक्षा एखाद्या ग्राहकाला जास्त रक्कमेच्या कर्जाची आवश्यकता असल्यास अन्य बँकांच्या मदतीने (सहभाग कर्ज योजनेद्वारे) त्या कर्जदारांची गरज भागविली जाते. अन्य बँकांकडून आलेल्या प्रस्तावातही आपली बँक सहभागी होत असते. अशाप्रकारे निरनिराळ्या १५ बँकांबरोबर अनेक कर्ज प्रकरणात आपण सहभागी आहोत.

गुंतवणूका

बँकेच्या गुंतवणूका कशा असाव्यात याबाबतचे धोरण बँकेने तयार केले आहे. त्यानुसारच वर्षभरातील गुंतवणुकीचे व्यवहार होत असतात. बाजारातील ढासळती स्थिती, घसरणारा रुपया, वाढती महागाई इत्यादी गोष्टींमुळे रिझर्व्ह बँकेने तसेच सरकारने आखलेले पतधोरण याचा परिणाम गुंतवणूक बाजारावर झाला. सहाजिकच याचा विपरीत परिणाम बँकींग क्षेत्रातील सर्वच गुंतवणुकांवर झाला.

कमीत-कमी जोखीम, चांगली तरलता आणि तुलनात्मक सुयोग्य परतावा या मुख्य निकषांवर आधारित आपले गुंतवणुकांचे निर्णय होत असतात. त्यासाठीच्या गुंतवणूक समितीच्या सभा नियमीत होत असतात, ज्यामध्ये गुंतवणुकांचा व त्याअनुषंगाने सर्व बाबींचा आढावा घेतला जातो. मार्च २०१२ अखेर बँकेच्या गुंतवणुका खालीलप्रमाणे आहेत.

अ.क्र.	तपशील	रक्कम (₹ कोटींमध्ये)
(१)	केंद्र व राज्य सरकारचे रोखे	६२३
(२)	सार्वजनिक उपक्रमांचे रोखे	७५
(३)	कमर्शिअल व खाजगी बँकांचे रोखे	५४
(४)	राष्ट्रीयकृत व खाजगी बँकांमधील आणि अन्य ठेवी	३६
(५)	म्युच्युअल फंडस / शेअर्स	२
	एकूण	७९०

विशेष महत्त्वाची बाब म्हणजे आपल्या सर्व गुंतवणूका पूर्णतः सुरक्षित आहेत व त्यावर आपल्याला नियमीत उत्पन्न मिळत आहे.

भागभांडवल

मागील वर्षी बँकेचे वसुल भाग भांडवल ₹ ५६.८८ कोटी होते. त्यामध्ये ५.७७ टक्के वाढ होऊन मार्च २०१२ अखेर बँकेचे **भाग-भांडवल ₹ ६०.१७ कोटी** झाले आहे.

या आर्थिक वर्षात ५८२१ नवीन सभासद झाले. सभासदाचा मृत्यू / राजिनामा यामुळे ११९५ इतकी सभासदसंख्या कमी झाली. मार्च २०१२ अखेर बँकेची **सभासद संख्या ७२,००७** आहे.

उत्तम आर्थिक स्थितीमुळे बँकेची भांडवल पर्याप्तता किमान अपेक्षित असलेल्या ९ टक्के या निकषापेक्षा खूपच अधिक म्हणजे १४.०८ टक्के आहे.

दुय्यम स्तराचे भाग-भांडवल (Tier II Capital) उभारणीच्या दृष्टीने सुरु करण्यात आलेल्या दीर्घ मुदतीच्या ''सहभाग ठेव योजनेस'' चांगला प्रतिसाद मिळतो आहे. ९ टक्के व्याजदराच्या या योजनेत मार्च २०१२ अखेर ₹ ६.१९ कोटी रक्कम जमा आहे.

उत्पन्न, नफा व नफा वितरण

जागतिक मंदीचा भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम झाला आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने पतधोरणात केलेल्या बदलामुळे ठेवींवरील व्याजदरात वाढ करावी लागली. परंतू स्पर्धात्मक वातावरणात कर्जावरील व्याजदरात वाढ करण्यामध्ये अनेक मर्यादा असतात. अशा विपरीत परिस्थितीतही बँकेने गतवर्षीपेक्षा अधिक नफा मिळविला. मार्च २०१२ अखेर बँकेचा **ढोबळ नफा ₹ ६१.९३ कोटीपर्यंत** पोहोचला आहे. बँकेस मिळालेल्या उत्पन्नामध्ये व्याजापासून मिळालेले उत्पन्न ₹ १५५.४२ कोटी आहे. नियमीत बँकींगसोबतच अन्यही काही सेवा आपली बँक पुरविते. त्यापासून म्हणजे फ्रँकिंग, म्युच्युअल फंडस् विक्री, डि-मॅट सेवा, जीवन विमा व सर्वसाधारण विमा यातून बँकेला **₹ १.३६ कोटी उत्पन्न** मिळाले आहे.

म्युच्युअल फंडस् तसेच जीवन विमा यांच्या कमिशनमध्ये संबंधित कंपन्यांनी

कमालीची कपात केली आहे. तरीही या व्यवसायातून समाधानकारक उत्पन्न मिळविण्यात आपण यशस्वी ठरलो आहोत.

सर्व उत्पन्न हिशोबात घेऊन बँकेला **ढोबळ नफा ₹ ६१.९३ कोटी** झाला आहे. सर्व तरतुदी वजा जाता बँकेचा निव्वळ नफा ₹ २७.०७ कोटी आहे. रिझर्व्ह बँक आणि सहकार खात्याच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन नफ्याची विभागणी खालीलप्रमाणे प्रस्तावित केली आहे.

नफा विभागणी

अ.क्र.	तपशील	रक्कम (₹ लाखात)
१	मागीलवर्षीचा शिल्लक नफा	०.६२
२	**अधिक** सन २०११-१२ साठीचा निव्वळ नफा	२७०७.४०
	एकूण	२७०८.०२

प्रस्तावित नफा विभागणी

अ.क्र.	तपशील	रक्कम (₹ लाखात)
१)	राखीव निधी (निव्वळ नफ्याच्या २५ टक्के)	६७७.००
२)	लाभांश (भाग-भांडवलावर १५ टक्के)	८८५.००
३)	संशयित व बुडित कर्ज निधी	४६७.३८
४)	गुंतवणूक चढ- उतार निधी	१३१.००
५)	धर्मादाय निधी (नफ्याच्या १ टक्के)	२७.०७
६)	भागधारक कल्याण निधी	२०.००
७)	कर्मचारी कल्याण निधी	००.५०
८)	इमारत निधी	५००.००
९)	शिल्लक नफा पुढील वर्षासाठी वर्ग	००.०७
	एकूण	२७०८.०२

मागील अनेक वर्षांप्रमाणे याहीवर्षी बँकेने १५ टक्के लाभांश प्रस्तावित केला आहे.

कार्यविस्तार

मार्च २०११ अखेर आपल्या बँकेच्या एकूण ३६ शाखा होत्या. एप्रिल २०११ ते मार्च २०१२ या कालावधीत आपण सांगली येथे नवीन शाखा सुरु केली आहे. त्यामुळे ३१ मार्च २०१२ अखेर बँकेच्या **शाखांची संख्या ३७** झाली आहे. एकूण दोन ठिकाणी (बोरिवली व अहमदनगर) शाखांचे पुनर्लोकन होणे बाकी असल्याने आपल्या बँकेकडील शाखा परवान्यांची संख्या ३९ आहे.

भांडुप, बोईसर, अंबड (नाशिक) व अहमदनगर येथील शाखा परवान्यांसाठी भारतीय रिझर्व्ह बँकेकडे प्रस्ताव सादर केला असून, नजिकच्या कालावधीत हे परवाने आपल्याला प्राप्त होतील असा विश्वास आहे. सन २०१२-१३ साठीच्या वार्षिक व्यवसाय आराखडा (Annual Business Plan) रिझर्व्ह बँकेस सादर केला आहे. या आराखड्यात पुणे, गिरगांव, परळ, रोहा, रत्नागिरी, लातूर, अमरावती, महापे आणि नवी मुंबई येथे शाखा उघडण्यासाठी अनुमती मागितली आहे.

वसुली व थकीत कर्जाचे निर्लेखन

या आर्थिक वर्षातील वाढती महागाई, घटलेले औद्योगिक उत्पादन इत्यादींमुळे कर्ज वसुलीच्या कामकाजात बरेच अडथळे निर्माण झाले. त्याही परिस्थितीत भेटी, पाठपुरावा, कायदेशीर कारवाई अशा अनेक प्रकारांनी प्रयत्न करून वसुली विभागाने चांगली कामगिरी करत **₹ ८.३० कोटी इतकी लक्षणीय वसुली** केली आहे. अहवाल वर्षात दाखल केलेले दावे व संबंधित माहिती खालीलप्रमाणे आहे.

अ.क्र.	तपशील	संख्या	रक्कम (₹ लाखात)
१.	दि. ३१-०३-२०११ अखेर शिल्लक दावे	२१	५०१.२३
२.	अहवाल वर्षात दाखल केलेले दावे	१५८	२६८१.६५
३.	अहवाल वर्षात मिळालेले निकाल	९१	९१३.५३
४.	दि. ३१-०३-२०१२ अखेर शिल्लक दावे	८८	२२६९.३५

थकित कर्जाच्या प्रत्येक प्रकरणात शक्य त्या सर्व कायदेशीर मार्गांनी वसुलीचे कठोर प्रयत्न करूनही वसुली न झालेल्या कर्ज खात्यांचे निर्लेखन आपण गेली काही वर्षे करीत आहोत. अर्थात, निर्लेखन म्हणजे कर्जमाफी असे धोरण न ठेवता त्याही कर्जांच्या वसुलीसाठी बँक प्रयत्नशील असते. त्यामुळे, संपलेल्या आर्थिक वर्षात, **निर्लेखन झालेल्या कर्जखात्यांपोटी ₹ ४.२४ कोटी वसुली** शक्य झाली आहे.मार्च २०१२ अखेरच्या नफा तोटा पत्रकात ही रक्कम ₹ २.७५ कोटी व विलीन झालेल्या बँकांच्या कर्जांपोटी ₹ १.४९ कोटी अशी स्वतंत्रपणे दर्शविली आहे.

गेल्या काही वर्षांप्रमाणे याहीवर्षी वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे निर्लेखनाचा प्रस्ताव आवश्यक त्या सर्व तपशीलांसह सादर होईल. या प्रस्तावास अंतर्गत तसेच वैधानिक लेखापरीक्षक अशा दोघांचीही मान्यता मिळाली आहे.

अत्याधुनिक तंत्रज्ञान

परंपरागत बँकींगबरोबरच अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करण्याचे धोरण बँकेने प्रथमपासूनच अंगीकारले आहे. गत पाच-सहा वर्षात कोणत्याही शाखेतून व्यवहार करण्याबरोबरच एस.एम.एस. बँकींग, इंटरनेट बँकींग (मर्यादित स्वरुपात), मोबाईल बँकींग सुविधा आपल्या बँकेने उपलब्ध करून दिली आहे. परिपूर्ण इंटरनेट बँकींग सुविधा सुरु करण्याच्या दृष्टीने रिझर्व्ह बँकेकडे प्रस्ताव सादर केला असून त्यास लवकरच मान्यता मिळण्याची शक्यता आहे.

रिझर्व्ह बँकेची अंगीकृत संस्था असलेल्या नॅशनल पेमेंटस् कॉर्पोरेशन ऑफ इंडिया (N.P.C.I.) या राष्ट्रीय पातळीवरील संस्थेचे सदस्यत्व आपण घेतले आहे. त्यामुळे या संस्थेच्या नॅशनल फिनान्शियल स्वीचद्वारा आपल्या बँकेच्या ए.टी.एम. कार्डद्वारा देशभरातील कोणत्याही खाजगी, सार्वजनिक तसेच शेड्यूल्ड सहकारी बँकांच्या **१,००,००० हून अधिक** ए.टी.एम. सेंटर्समधून ग्राहकांना पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.

त्याचप्रमाणे आपल्या बँकेच्या २२ ए.टी.एम. सेंटर्समधून कोणत्याही बँकेच्या ए.टी.एम. कार्डद्वारेही पैसे काढण्याची सुविधा उपलब्ध आहे.

एन.पी.सी.आय. ही संस्था ''रुपे'' (Rupay) या बोधनामाने (Brand Name) डेबिट कार्ड बाजारात आणणार आहे. याद्वारे एका भारतीय कंपनीचे डेबिट कार्ड व्यवसायात पदार्पण होणार आहे. एन.पी.सी.आय. ने या प्रकल्पासाठी आपल्या बँकेची निवड केली असून त्यामुळे लवकरच आपल्या बँकेच्या ग्राहकांना ''रुपे डेबिट कार्ड'' मिळू शकणार आहे. देशभरातील विविध आस्थापनांमध्ये या डेबिट कार्डाचा उपयोग करता येणार आहे. त्यामुळे ग्राहकांना खिशात रोख रक्कम बाळगण्याची जोखीम पत्करावी लागणार नाही. बँकेचे सर्व ग्राहक या ''रुपे'' कार्डाचे नक्कीच स्वागत करतील असा विश्वास आहे.

सध्याच्या धकाधकीच्या जीवनात बँकेच्या कामकाजाच्या वेळा गाठणे जिकीरीचे होते. म्हणूनच अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून ग्राहकांच्या सोयीसाठी, प्राथमिक स्वरुपातील परंतू महत्त्वाचे सर्व व्यवहार दिवसभरात कधीही करता यावेत या दृष्टीने बँकेने आपल्या मुख्य शाखेत बँकींगचे पहिले **अत्याधुनिक दालन (ई-लॉबी)** सुरु केले आहे. हे दालन वर्षाचे सर्व दिवस तसेच २४ तास खुले असून, या दालनातून ग्राहकांना पैसे काढणे (एटीएम), आपल्या खात्यात रोख रक्कम भरणे, आपल्या खात्यात चेक भरणे, आपले पासबुक भरून घेणे तसेच आपल्या खात्याचे स्टेटमेंट प्रिंट करणे शक्य होणार आहे. हे सर्व व्यवहार अतिशय सहज सोपे असून सदर व्यवहार कसे करावेत याबाबतच्या सूचना (इंग्रजी व मराठी) अत्याधुनिक दालनात प्रदर्शित केल्या आहेत. हे दालन आपल्या सर्व शाखांशी जोडलेले असून, ग्राहकांना कोणत्याही शाखेचा कोणताही व्यवहार या दालनातून करता येणार आहे. अनेक ग्राहकांचा या दालनाला चांगला प्रतिसाद मिळतो आहे.

ग्राहकांना विविध सेवा एका छत्राखाली उपलब्ध व्हाव्यात हा देखील बँकेचा उद्देश राहिला आहे. म्हणूनच सर्वसाधारण विमा, जीवन विमा, म्युच्युअल फंड, डी-मॅट अकाऊंटस, फ्रँकींग इ. सेवा बँकेने उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यासाठी बजाज अलायन्झ, कोटक लाईफ, तसेच रिलायन्स म्युच्युअल फंड, स्टॉक होल्डिंग कॉर्पोरेशन या कंपन्यांशी बँकेने सामंजस्य करार केले आहेत.

ग्राहकांच्या सोयीसाठी माफक शुल्कात ग्राहकांचे विविध प्रकारचे कर (टॅक्सेस) नेट बँकींगद्वारे (ई-पेमेंटस्) भरण्याची व्यवस्था बँकेत उपलब्ध आहे. या सुविधेचा लाभ अनेक खातेदार घेत आहेत.

परम प्रणाली (आय. एस. ओ.)

कामकाजाचे सुसुत्रीकरण, प्रमाणीकरण ही काळाची गरज बनली आहे. ग्राहकांना केंद्रबिंदू मानून त्यांचे समाधान वाढविणे त्याचप्रमाणे संस्थेच्या कामकाजाचा दर्जा उंचावणे हा प्रमाणीकरणाचा एक प्रमुख हेतू आहे. आज अनेक आस्थापनांनी, उद्योगांनी आपल्या कामकाजाचे प्रमाणीकरण (ISO) केले आहे. आपल्या बँकेनेही काही विभागांचे व काही शाखांचे प्रमाणीकरण करण्याचा प्रकल्प हाती घेतला. बँकेची **मुख्य शाखा व घाटकोपर शाखा तसेच बँकेचा मनुष्यबळ विकास विभाग (H.R. Dept.), माहिती- तंत्रज्ञान विभाग (I.T. Dept.), दर्जा व्यवस्थापन (Quality Management), माहिती - सुरक्षा व्यवस्थापन प्रणाली (Information Security Management System), कायदा विभाग (Legal Dept.) व गुंतवणूक विभाग (Investment & Treasury Dept.)** यांचे प्रमाणीकरणाचे काम पूर्ण झाले असून टीयुव्ही नॉर्ड जर्मनी या कंपनीकडून **ISO ९००१:२००८** तसेच **ISO २७००१:२००५** ही प्रमाणपत्रे प्राप्त झाली आहेत.

प्रमाणपत्रे प्राप्त झाल्यानंतरही, प्रमाणीकरणाच्या कामकाजाबाबत ठराविक कालावधीने लेखापरीक्षण केले जाते. टीयुव्ही नॉर्ड- इंडिया या कंपनीने नुकतेच आपल्या बँकेचे लेखापरीक्षण केले व सदर प्रमाणपत्रे आगामी कालावधीसाठीही वैध असल्याचा निर्वाळा दिला आहे.

सामाजिक बांधिलकी

बँकींग व्यवसायाबरोबरच बँक नेहमीच सामाजिक बांधिलकीच्या भावनेने कार्यरत आहे. मार्च २०११ अखेर झालेल्या नफ्यातून बँकेने ह्यावर्षी सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक तसेच ग्रामीण क्षेत्रात काम करणाऱ्या ११९ संस्थांना अनुदान स्वरुपात ₹ २५.७६ लाख दिले आहेत.

अल्प उत्पन्न गटांना विविध सेवा उपलब्ध व्हाव्यात व त्यांचे जीवनमान सुधारावे या दिशेने आपली बँक नेहमीच प्रयत्नशील राहिली आहे. त्याचाच एक भाग म्हणून बचतगटांमार्फत शहापुर तालुक्यातील अनेक गावांत आपण संपर्क सुस्थापित केला आहे. त्या माध्यमातून कुक्कुटपालन, पशुपालन, दुग्धव्यवसाय, खतांची खरेदी, स्वयंपाकाचा गॅस घेणे इ. कारणांकरीता आपल्या बँकेने अर्थसहाय्य केले आहे. या कर्जांची परतफेड समाधानकारक आहे. या कामी सहकार भारती प्रेरित उत्कर्ष नाविन्यपूर्ण सहकारी संस्था मर्यादित यांचे सहकार्य लाभले आहे.

सहकारी बँकींग क्षेत्रात प्रदीर्घ काळ कार्यरत असलेले सहकार भारतीचे पहिले सरचिटणीस **मा. श्री. वसंतराव देवधर** यांना यावर्षीच्या **''सहकार मित्र''** पुरस्काराने गौरविण्यात आले.

सामाजिक वनीकरण प्रकल्पासाठी मुरबाड जवळील मामणोली परिसरातील केळणी येथील जागा बँकेने निश्चित केली आहे. पर्यावरण दक्षता मंच या संस्थेच्या सहकार्याने हा प्रकल्प आकारात येत असून, महाराष्ट्र सरकारच्या वन खात्याशी याबाबत त्रिपक्षीय करार करण्यात येत आहे.

वर्ष २०१२ हे आंतरराष्ट्रीय सहकारवर्ष म्हणून घोषित झाले आहे. या पार्श्वभूमीवर बँकेने विविध उपक्रमांचे आयोजन केले. दि. ०८ मार्च या जागतिक महिला दिनानिमित्त डोंबिवली येथे महिला मेळावा आयोजित करण्यात आला होता. बँकेच्या ग्राहक (खातेदार), सभासद असलेल्या आणि विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या महिलांना या कार्यक्रमास निमंत्रित करण्यात आले होते. यावेळी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मुख्य सरव्यवस्थापक मा. सौ. सुधा दामोदर प्रमुख पाहुण्या म्हणून तर भारतीय रिझर्व्ह बँकेच्या उपसरव्यवस्थापक मा. सौ. के. ज्योत्स्ना तसेच सारस्वत को-ऑप. बँकेच्या सरव्यवस्थापक मा. सौ. उर्वशी धराधर विशेष अतिथी म्हणून उपस्थित होत्या. या कार्यक्रमास अतिशय उत्तम प्रतिसाद मिळाला.

ज्या शहरात आपली बँक आहे, त्या शहराचे आपण काही देणे लागतो या भावनेने डोंबिवली पश्चिमेकडील कै. पदूशेठ म्हात्रे चौकाचे सुशोभीकरण करण्याचा निर्णय बँकेने घेतला. कल्याणमधील प्रसिध्द शिल्पकार श्री. सिध्दार्थ साठे यांच्या संकल्पनेतून साकारलेले नयनमनोहर शिल्प आज त्या चौकात स्थापित केलेले आहे. शिल्पाच्या बरोबरीने नयनरम्य कारंजे व सुंदर प्रकाशव्यवस्था यामुळे सदर चौक खूपच प्रेक्षणीय बनला आहे.

कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या मा. महापौर सौ. वैजयंती गुजर-घोलप यांच्या शुभहस्ते अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत या सुशोभित चौकाचे लोकार्पण करण्यात आले.

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यवसाय संधी या विषयावर व्याख्यानाचा कार्यक्रम बँकेने आयोजित केला होता. यावेळी आयफ्लेक्स सोल्युशन्सचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. दीपक घैसास हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते.

बँकेने कुसुमाग्रज प्रतिष्ठान- नाशिक या संस्थेच्या संयुक्त विद्यमाने ''ग्रंथ तुमच्या दारी'' हा अभिनव उपक्रम राबविला. याद्वारे उत्तम व दर्जेदार पुस्तके कल्याण, बदलापूर व अंबरनाथ येथे वाचकांसाठी विनामुल्य उपलब्ध करून दिली आहेत.

भागधारक कल्याण निधी

बँकेचा भागधारक कल्याण निधी आज रोजी ₹ ७६ लाख आहे. या ठेवींच्या व्याजातून सदरच्या निधीद्वारे सभासदांना व त्यांच्या कुटुंबियांना मदत केली जाते तसेच पुरस्काराने सन्मानित केले जाते. संपलेल्या आर्थिक वर्षात सभासद पाल्यांना पुरस्कारापोटी ₹ १.९५ लाख, मयत सभासदांच्या वारसदारांना ₹ ०.७५ लाख आणि अनेक सभासदांना व त्यांच्या कुटुंबियांना त्यांच्या विविध प्रकारच्या वैद्यकीय उपचारांकरीता रक्कम ₹ ४.८५ लाख देण्यात आली.

यापूर्वी या निधीच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरीक असलेल्या सभासदांची वैद्यकीय तपासणी करण्यात येत असे. बँकेने यावर्षी ही वयोमर्यादा कमी करून वय वर्षे ४० व त्यावरील भागधारकांकरीता सर्वंकष वैद्यकीय तपासणीचे आयोजन केले होते. यामध्ये १००० भागधारकांनी सहभाग घेतला.

बँकेच्या सभासदांकरीता ''शंभुराजे'' या महानाट्याचे प्रायोजकत्व बँकेने स्वीकारले होते. दि. २१ ते २६ जानेवारी २०१२ या काळात अनेक भागधारकांनी याचा लाभ घेतला.

दलित- शोषित तसेच उपेक्षित समाजबांधवांच्या उत्कर्षासाठी कार्य करणारी व्यक्ती अथवा संस्था यांना ''समाजमित्र'' पुरस्कार, मानपत्र आणि गौरवार्थ रक्कम ₹ ५१,०००/- देण्याची तरतूद भागधारक कल्याण निधीच्या लाभार्थी योजनेत आहे. या निधीच्या वतीने प्रतीवर्षी देण्यात येणारा ''समाजमित्र पुरस्कार'' ह्यावर्षी मसनजोगी समाजाच्या उत्कर्षासाठी झटणाऱ्या ''मसनजोगी समाज विकास संस्था - उमरगा'' चे सचिव मा. श्री. संजीव विभुते यांना प्रदान करण्यात आला.

आस्थापना

बँकींग उद्योगातील वाढती स्पर्धा लक्षात घेऊन उपलब्ध मनुष्यबळाचा कार्यक्षमतेने वापर करून घेणे आवश्यक आहे. बँकेचे वाढते कामकाज, वाढत्या शाखा याचा विचार करून गुणवत्तेच्या निकषांवर अनेक कर्मचाऱ्यांना व अधिकाऱ्यांना बढती देऊन पदोन्नती देण्यात आली आहे.

नव्या तसेच बँकेच्या सेवेत पूर्वीपासून असलेल्या कर्मचाऱ्यांची, अधिकाऱ्यांची गुणवत्ता वाढावी यासाठी विविध प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, वैकुंठ मेहता राष्ट्रीय सहकारी प्रबंध संस्था, सहकार भारती, एनआयबीएम, नायबर अशा विविध मान्यवर प्रशिक्षण संस्थांचे मार्गदर्शन घेतले गेले. कर्मचाऱ्यांनी अधिकाधीक प्रशिक्षण घ्यावे म्हणून बँक त्यांना नेहमीच उत्तेजन देते.

अहवाल वर्षामध्ये बँकेचे कर्मचारी व अधिकारी यांच्या वेतनातील वाढीसंबंधीचा करार अतिशय उत्तम प्रकारे संपन्न झाला.

बँकेच्या वर्धापनदिनाचे औचित्य साधून सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी बँकेचे सदिच्छादूत डॉ. सलील कुलकर्णी यांचा ''आयुष्यावर बोलू काही '' हा कार्यक्रम योजण्यात आला होता. या कार्यक्रमास सर्वदूर ठिकाणांहून अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्राहक सेवा

ग्राहकाभिमुख सेवा याला व्यवस्थापनाने नेहमीच प्राधान्य दिले आहे. गत ६-७ वर्षांपासून अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर बँक करत आहे. ए.टी.एम.कार्ड, एस.एम.एस. बँकींग, मर्यादित स्वरुपातील इंटरनेट बँकींग, मोबाईल बँकींग, ई-लॉबी इत्यादी विविध प्रकारच्या सेवा बँकेने उपलब्ध केल्या आहेत. कोअर बँकींग प्रकल्पामुळे कोणत्याही शाखेतून व्यवहार करणे शक्य झाले आहे. डोंबिवली व बदलापूरमधील शाखांच्या कामकाजाच्या वारांचे योग्य नियोजन करून ग्राहकांना आठवड्याचे सातही दिवस बँकींग सेवा उपलब्ध आहे. डोंबिवलीतील ग्राहकांना तर दिवसभरातील १२ तास बँकींग सेवा उपलब्ध केली आहे. त्यादृष्टीने डोंबिवली शहरातील दोन शाखांच्या कामकाजाच्या वेळेत बदल केला आणि त्यास ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळतो आहे.

सन २०११-१२ या आर्थिक वर्षात बँकेकडे विविध प्रकारच्या १५ तक्रारी दाखल झाल्या. त्या सर्वांचे समाधानकारक निराकरण केले आहे.

लेखापरीक्षण :

बँकेच्या शाखांचे लेखापरीक्षण करण्यासाठी स्वतंत्र लेखापरीक्षण विभाग कार्यरत आहे. तसेच १५ सनदी लेखापाल संस्थांद्वारे (Chartered Accountant Firms) निरनिराळ्या शाखांचे लेखापरीक्षण होत असते. १५ मोठ्या शाखांचे निरंतर लेखापरीक्षण (Concurrent Audit) होत असते. करविषयक लेखापरीक्षणाचे (Tax Audit) काम मे. सिंगवी, ओतूरकर आणि केळकर या आस्थापनेकडून होत असते. गत दोन वर्षांपासून केंद्रीय कार्यालयाच्या सर्व विभागांचे लेखापरीक्षण मुख्य अंतर्गत लेखापरीक्षक मे. मुकुंद चितळे अँड कंपनी यांच्याकडून करण्यात येत आहे. सर्व शाखा व विभागांचे लेखापरीक्षण अहवाल संबंधित समिती नियमीतपणे बारकाईने पहात असते. लेखापरीक्षकांच्या सूचनांप्रमाणे कामकाजात सुधारणा केल्या जातात.

आपल्या बँकेचे संपलेल्या आर्थिक वर्षाचे वैधानिक लेखापरीक्षण मे. मित्तल अँड असोसिएट्स, सनदी लेखापाल या नामांकित आस्थापनाने केले असून

गेल्या सर्व वर्षांप्रमाणेच आपल्या बँकेला याहीवर्षी ऑडिटवर्ग ''अ'' मिळाला आहे.

जोखीम व्यवस्थापन

व्यवसायातील जोखीम वेळीच लक्षात येण्याकरीता बँक विविध उपाय योजत असते. त्याबाबतचा काही तपशील पुढीलप्रमाणे आहे.

कर्जातील जोखीम

बँकेद्वारा कर्ज देत असतांना कर्जदार उपलब्ध करीत असलेल्या तारण मालमत्तेबाबतची कागदपत्रे तपासून घेणे, तसेच कर्जासंबंधी करावयाची करारपत्रे, विविध कागदपत्रांची पाहणी करणे यासाठी बँकेमध्ये ''कायदा विभाग'' कार्यरत आहे. बँकेने या विभागाचे काम अधिक सक्षमतेने व जलद व्हावे यासाठी या विषयातील उत्तम ज्ञान आणि अनुभव असलेल्या व्यवस्थापकीय अधिकाऱ्यांच्या नेमणूका केल्या आहेत.

बँकेने स्वतःचे कर्ज धोरण तयार केले आहे. त्याचा आढावा वेळोवेळी घेऊन त्यात आवश्यक ते बदल केले जातात. मोठ्या कर्ज खात्यांची स्टॉक ऑडिटस् आणि कर्ज प्रकरणांच्या पतमापनाची (Credit Rating) पध्दत बँकेत सुस्थापित आहे. एकाच क्षेत्राकडे कर्ज पुरवठा केंद्रीत न करता विविध प्रकारच्या कारणांसाठी - उद्योगांसाठी आपली बँक कर्जपुरवठा करीत आहे. प्रत्येक कर्जप्रकरणात पुरेशी सावधानता बाळगून, स्वयंनियंत्रित मर्यादेच्या अंतर्गत कर्ज वितरण केले जाते.

व्याजदरातील जोखीम

रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक तत्वानुसार, बँकेतील एकूण ठेवी व स्पर्धक बँकांचे व्याजदरांचे अवलोकन करून बँकेचे संचालक मंडळ आपले कर्ज तसेच ठेवींचे व्याजदर ठरविते.

भौगोलिक जोखीम

बँकेचे कार्यक्षेत्र ''महाराष्ट्र राज्य'' असे आहे. सध्या बँकेच्या ११ जिल्ह्यात ३७ शाखा कार्यरत आहेत. व्यवसाय विस्तार व्हावा व त्याद्वारे अधिकाधीक नागरीकांना बँकेची सेवा उपलब्ध व्हावी या हेतूने लवकरच नगर जिल्ह्यात बँक प्रवेश करीत आहे. त्यामुळे बँकेचा शाखाविस्तार महाराष्ट्रातील १२ जिल्हयांमध्ये होईल.
बँकेच्या दि. ०३ मार्च २००७ रोजीच्या विशेष सर्वसाधारण सभेने ठराव क्र. २ द्वारे बँकेचे कार्यक्षेत्र महाराष्ट्राबाहेर वाढविण्यास अनुमती दिली आहे. त्याअनुषंगाने बँकेचे कार्यक्षेत्र वाढीसाठी आवश्यक ती कार्यवाही बँक लवकरच करीत आहे आणि या दृष्टीने आवश्यक असलेली पोटनियम दुरुस्ती याच सभेत प्रस्तावित केली आहे.

व्यावसायिक जोखीम

बँकेच्या अंतर्गत कामकाजाकरीता मार्गदर्शक म्हणून विविध विषयांच्या मार्गदर्शक पुस्तिका (Instruction Manuals) तयार केली आहेत व त्याच्या प्रती प्रत्येक शाखेमध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या संदर्भासाठी उपलब्ध ठेवल्या आहेत.

गतवर्षी बँकेने कार्यप्रणाली लेखापरीक्षण (System Audit) करून घेतले आहे. कोअर बँकींग सोल्युशन या प्रणालीसाठी, अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर होतो आहे. त्यामुळे केंद्रीय कार्यालयात अनेकविध कामे व अहवाल तयार होत असतात. या पार्श्वभूमीवर ऑपरेटिंग सॉफ्टवेअर, डेटाबेस, केंद्रीय कार्यालयातील संगणकविषयक व्यवस्था तसेच शाखांसंबंधित विविध प्रणाली यांची सुरक्षितता व अचुकता तपासण्याकामी या लेखापरीक्षणाची चांगली मदत झाली.

संचालक मंडळ

रिझर्व्ह बँक व सहकार खात्याच्या धोरणानुसार बँकेच्या संचालक मंडळात निरनिराळ्या क्षेत्रातील तज्ज्ञ व अनुभवी व्यक्ती कार्यरत आहेत. बँकेच्या व्यवसायवृध्दीस त्यांच्या ज्ञानाचा तसेच अनुभवाचा चांगला उपयोग झाला आहे.

गेल्या आर्थिक वर्षात संचालक मंडळाच्या २५ सभा झाल्या. सर्व सभांमधील संचालकांची उपस्थिती समाधानकारक होती. सभेतील विषयांवर सखोल चर्चा होऊन सर्व निर्णय एकमताने घेतले गेले.

विद्यमान संचालक मंडळाचा कार्यकाल संपत आला आहे. विद्यमान संचालक मंडळ जुलै २००७ मध्ये बिनविरोध निवडून आले होते. संचालक मंडळाने त्यावेळी जेव्हा पदभार स्वीकारला त्यापूर्वी बँकेच्या ठेवी ₹ ७९३ कोटी तर कर्ज व्यवहार ₹ ५२८ कोटी होत्या. बँकेचा मिश्र व्यवसाय ₹ १३२१ कोटी होता. या कार्यकाळात बँकेने सर्वच क्षेत्रात सर्वांगीण प्रगती साधली आहे. ठेवी, कर्ज व मिश्र व्यवसाय या सर्वच आघाड्यांवर जवळपास अडीच ते तीन पट वाढ झाली आहे. वार्षिक निव्वळ नफ्यामध्येही तिप्पट वाढ झाली आहे. शाखाविस्तारही २० शाखांपासून ३७ शाखांपर्यंत वाढला आहे. संचालक मंडळाची ही कामगिरी निश्चितच अभिमानास्पद आहे.

सर्व संचालक सहकाऱ्यांनी एकदिलाने, सामुहिकपणे आणि संघभावनेने केलेल्या कामामुळेच बँकेची ही प्रगती शक्य झाली आहे.

आभार

बँकेच्या आजवरच्या वाटचालीत अनेकांचा मोलाचा सहभाग लाभला आहे. बँकेचे अधिकारी तसेच कर्मचारी यांचा सहभाग विशेष उल्लेखनीय आहे. बँकेचे सभासद, ठेवीदार, ग्राहक व अन्य संबंधितांचे सहकार्य बँकेला वेळोवेळी मिळाले आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, सहकार खाते तसेच संबंधित शासकीय यंत्रणा यांच्या सहकार्याचा लाभ वर्षभर मिळतो. वैधानिक तसेच अंतर्गत लेखापरीक्षकांच्या मार्गदर्शनाबद्दल आम्ही आभारी आहोत. बँकेसंबंधित अनेक व्यक्ती, संस्था, माजी संचालक, सल्लागार, वकील, आर्किटेक्टस्, कॉन्ट्रॅक्टर्स, व्हॅल्युअर्स, आपले बँकर्स, विविध प्रशिक्षण संस्था, म्युच्युअल फंडस् मॅनेजर्स, विमा कंपनीज्, हितचिंतक व अन्य कार्यकर्ते तसेच सर्व व्यवस्थापकीय व अन्य अधिकारी आणि कर्मचारी यांचा मिळालेला पाठिंबा व प्रेम याबद्दल संचालक मंडळातर्फे मनापासून धन्यवाद !

उदय कर्वे
अध्यक्ष

Dear fellow Shareholders,

Greetings!
I am pleased to present 42nd Annual Report of the Bank for the financial year 2011-12.

Preamble
Your bank has made an impressive all round progress in the financial year 2011-12. The progress is remarkable as it is achieved on the backdrop of heightened challenges and obstacles at national and international level. Falling Growth rate and rising inflation are the two critical challenges faced at national level. During the year, both the rates of Industrial Output and Financial growth were at lowest in past few years. Devaluation of Rupee is another cause of grave concern.
Both the Finance ministry and RBI are facing challenge of controlling inflation and strengthening the economy simultaneously. RBI has consistently raised the PLR 13 times aggregating to 3.75%. The total deposits in banking sector grew by 13% and Advances by 17%.

PREFACE

Even on this background your Bank has shown a rise of 21% in Deposits and 26% in Advances. The total deposits have reached upto ₹ 2210 crores and Advances upto ₹ 1524 crores, which signifies a satisfactory progress of the Bank. **Indian Banks Association has published performance highlights of all co-operative banks for the financial year 2010-11. We are happy to note that, ratio of Gross Profit with working Capital of our Bank is 3.15%, which is highest amongst all co-operative Banks in India.** Following details substantiate the remarkable progress of our Bank.

DEPOSITS

In the year under review, Bank's Deposits have grown by 21% which is more than the average rise of Deposits in banking industry. The noteworthy rise in Deposits shows the confidence showered by our Depositors on our Bank. After Scientific Analysis of competition in the Interest Rates, welfare of Depositors, banks Deposits & Advances, Bank introduced new Deposit Schemes like, PARAM, VARAD, RIDDHI-SIDDHI, OJASWINI etc. These Deposit schemes received a notable response.

The savings & current deposits of our Bank are 31% of our Total Deposits. Among the total deposits, various institutions hold 9% of Deposits. Our Bank has already paid insurance upto September 2012 on these deposits. As at the end of financial year 2011-12 Bank had a Total Number of 4,16,252 Deposits accounts. These accounts were 3,79,381 in the previous year. The Board of Directors took a periodical review of the Deposit Schemes and made necessary changes in the interest rates from time to time.

ADVANCES

The Advances increased by 26% during the financial year. This growth rate is high than the average growth in Banking Industry. As at the end of March 2012, the number of Advances accounts were 28,575. Considering the changing needs of the customers, Bank introduced various Loan schemes during the year. One such scheme is titled as "Suvarna Sanchay Loan". This scheme was introduced by the Bank considering the rising prices of gold. At only 13%

(March ended position- ₹ in crores)

Particulars	2007	2008	2009	2010	2011	2012
1 Capital	26	31	43	50	57	60
2 Deposits	793	1003	1269	1554	1829	2210
3 Loans	528	663	799	961	1209	1524
4 Investments	299	376	537	742	715	790
5 Gross Profit	25	31	38	42	58	62
6 Net Profit	9	12	19	22	26	27
7 Per Employee Business	3	4	4	5	5	5
8 Gross NPA (%)	11.22	9.60	4.64	4.54	5.10	4.46
9 Net NPA (%)	Zero	Zero	Zero	Zero	Zero	Zero
10 Branches	18	28	30	35	36	37

interest rate, Bank has made available loan upto an amount of ₹ 5.00 Lakhs for purchase of Gold.

Bank provides loans under SME Scheme in order to encourage the Small and Micro enterprises. After reviewing various financial measures Bank offers concession in the interest rate to these SMEs as per the credit rating. The SMEs fulfilling the various financial criteria are extended the loans at only 12.25%. Many entrepreneurs have taken advantage of the scheme.

Your Bank has entered into a mutual Understanding with NABARD & SIDBI in order to provide subsidy on the loans borrowed by SMEs; in Textile and Agro industries for the purpose of the purchase of machinery. In order to receive this subsidy, Bank has initiated the processing of some applications, and the final decision is expected very soon.

The bifurcation of loans disbursed by the Bank during the financial year 2011-12 is as under:

Sr. No.	Particulars	₹ (in crores)	% of Total Loans
1)	Industrial loan	678.70	44.52.
2)	Housing Loan	279.77	18.35
3)	Trade	243.58	15.98
4)	Professionals	41.78	2.74
5)	Education	15.35	1.01
6)	Transport	127.21	8.35
7)	Agriculture	13.41	0.88
8)	Others	124.62	8.17
	Total	1524.42	100.00

As per the financial measures, RBI sets a limit to the amount of loan to be disbursed to an individual borrower. However, our Bank has set a self controlled limit on the disbursement amount which is much lesser than the limit fixed by RBI. In case, any borrower is in need of loan amount more than the set limit, then the Bank fulfils this needs in co-operation/ collaborations with other banks under "Consortium" arrangement.

Similarly our Bank enters in to consortium with other Banks having such proposals.

INVESTMENTS

Bank has designed its own Investment Policy which acts as a guideline for the Bank while investing the funds. The Investments during the year are made accordingly. The general investment environment was lacklustre with plummeting markets, devaluating rupee and high inflation. Naturally, this has adversely affected the Investments of banking industry.

Minimum Risk, Good Liquidity and Competitive returns are the parameters; based on which our investment decisions are made. The Investment Committee holds its meetings regularly to review our investments and related issues in market. as on 31.03.2012 our Investment Portfolio was as under:

Sr. No.	Particulars	₹ in Crores
(1)	GOI Bonds	623
(2)	PSU Banks	75
(3)	Bonds issued by Commercial & Private Sector Bank	54
(4)	Deposits placed with Nationalised & Private Sector Banks	36
(5)	Mutual Fund Schemes	2
	Total	790

It should be specifically mentioned that all our Investments are secure and gaining regular returns.

SHARE CAPITAL

